नागपूर-मुंबई शिघ्रगती दुरसंचार महामार्गासाठी भारतीय स्टेट बँकेकडून रु.४००० कोटींचे अंतरिम कर्ज उभारण्यास नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. (SPV) यांना शासन हमी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक : शाहमी-२०१९/ सा.बां.वि./प्र.क्र. ४७/अर्थबळ,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ०७ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> -१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी -१०९९/प्रक्र.६८/शा.हमी, दि. ५.११.१९९९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी -१००८/प्रक्र.१८/शा.हमी,दि.२८.४.२००८
३) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.४६७/रस्ते-८ दि.१९.८.२०१६
४) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८ दि.२२.११.२०१७
५) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८(एलबी-२२) दि.१४.६.२०१८
६) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१(एल.बी.२२)भाग-१/ रस्ते-८, दि.१.१०.२०१८
७) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. यांचे क्र. NMSCEL/Director/६५४ दि.२३.७.२०१९ चे पत्र
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी-२०१९/ सा.बां.वि. /प्र.क्र. ४७/अर्थबळ, दि. २९ जुलै,२०१९.

<u>प्रस्तावना:</u>

नागपूर-मुंबई शिघ्रगती दुरसंचार महामार्ग हा ७०१ कि.मी. लांबीचा असून त्याची एकूण प्रकल्प किंमत रु.५५३३५.३२ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन हे “प्राधिकरण”(Authority) असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ “प्रायोजक” (Sponsor) व नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. ही विशेष उद्देश वहन /सवलतकार (SPV/Concessionaire) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीपैकी रु.४००० कोटीचे अंतरिम कर्ज वित्तीय संस्थांकडून उभारण्यास नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीस शासन हमी देण्यास मा. मंत्रिमंडळाने दि.१६ जुलै,२०१९ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. तसेच सदर शासन हमीवरील देय हमीशुल्काचे भागभांडवल स्वरुपात रुपांतर करण्यास देखील सदर मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केल्यानुसार नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीस रु.४००० कोटी (रुपये चार हजार कोटी) इतके अंतरिम कर्ज उभारण्यास संदर्भाधिन क्र.८ वरील दिनांक २९ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वय शासन हमी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परि. क्र. ४ व ५ मध्ये अंशत: बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सुधारित शासन निर्णय खालील प्रमाणे आहे.

शासन निर्णय :

नागपूर-मुंबई शिघ्रगती दुरसंचार महामार्ग प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीपैकी रु.४००० कोटीचे (रु.चार हजार कोटी) अंतरिम कर्ज भारतीय स्टेट बँकेकडून (धनको) उभारण्यास नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीस (ऋणको) शासन हमी मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर शासन हमीची कालमर्यादा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष इतकी राहील.

३. नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि./महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने शक्यतो Financial Closure दि.१५ सप्टेंबर, २०१९ पूर्वी पूर्ण करावे.

४. धनको बँकेसमवेत शासन हमीवर घेण्यात येणाऱ्या अंतरिम कर्जासंबंधी करण्यात येणाऱ्या करारपत्रात खालील अटी व शर्तींचा समावेश करण्यात यावा.

४.१) करारनाम्याशिवाय किंवा करारनामा स्वाक्षरीत होण्यापूर्वी बँकेने कर्ज संवितरीत केल्यास शासन हमी अवैध ठरेल.

४.२) शासन हमी एकूण रु.४००० कोटी इतक्या अंतरिम कर्जाच्या रकमेपुरतीच सिमीत राहील.

४.३) वित्तीय परिसमाप्ती (Financial Closure) झाल्यानंतर प्रकल्पासाठी धनकोने दिलेल्या कर्जातून अंतरिम सुविधेची परतफेड करण्यात येईल. महाराष्ट्र शासनाची हमी, अंतरिम कर्जाची परतफेड केल्यानंतर किंवा मंजूर हमीच्या कालावधी नंतर, यापैकी जे आधी घडेल तेव्हा संपुष्टात येईल.

४.४) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीकडून अंतरिम कर्जाच्या परतफेडीबाबत अथवा व्याजाची रक्कम देण्याबाबत होणा-या कसुरीची सूचना शासनास ३० दिवसात देणे धनको संस्थेस बंधनकारक असेल.

४.५) धनको संस्था ही नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीला आदेशामध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक अंतरिम कर्ज देणार नाही.

वरील (४.१) ते (४.५) पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास शासन हमी अवैध होईल.

५. नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीस रु.४००० कोटीच्या अंतरिम कर्जासाठी दिलेली शासन हमी संदर्भाधिन अ.क्र. १ येथील दि.५.११.१९९९ मधील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी तसेच, खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहील:-

५.१) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनी ही Principal Debtor राहील.

५.२) सदर धनको कडून घेण्यात येणा-या अंतरिम कर्जाचा वापर ज्या उद्दीष्टासाठी ते घेण्यात आले आहे त्यासाठीच करण्यात यावा.

५.३) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीने आवश्यक तेवढयाच अंतरिम कर्जाची उचल करावी.

५.४) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीने भारतीय स्टेट बँकेकडून घेतलेल्या अंतरिम कर्जाची परतफेड करण्यास विलंब झाल्यास त्याकरिता आकारण्यात आलेल्या दंडनीय व्याजाकरीता शासन हमी लागू होणार नाही.

५.५) धनको कडून अंतरिम कर्ज घेतांना रिझर्व बँकेच्या प्रचलीत बँक दराचा विचार करुन त्यानुसार व्याजाचा दर कमीतकमी असेल याची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग/ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ/ नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनी यांची राहील.

५.६) सदरचे अंतरिम कर्ज (मुद्दल + व्याज) फेडण्याची संपूर्ण जबाबदारी नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीची व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची राहील.

५.७) धनको संस्थांकडून घेण्यात आलेल्या अंतरिम कर्जातून निर्माण होणारी भविष्यातील मालमत्ता ही राज्य शासनाकडे कर्जाची परतफेड होईपर्यंत तारण म्हणून ठेवण्यात यावी. या बाबतची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची राहील.

५.८) सदर शासन हमीवर देण्यात आलेल्या कर्जाचे दायित्व शासनावर येणार नाही याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने संपूर्ण दक्षता घ्यावी.

५.९) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीने दर महिन्याला अंतरिम कर्ज परतफेडीच्या प्रगतीबाबतची स्थिती दर्शविणारी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे / महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे/वित्त विभागाकडे सादर करावी.

५.१०) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीने विहित कार्यपध्दतीने लेखा परिक्षित केलेल्या लेख्यांची एक प्रत सार्वजनिक बांधकाम विभाग/वित्त विभागास सादर करावी.

५.११) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनी त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये दर सहा महिन्यांनी (३०मार्च/३०सप्टेंबर) सार्वजनिक बांधकाम विभागास/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सादर करेल.

५.१२) प्रकल्प बांधकाम कालावधीत (Interest During Construction) व्याज अर्थसंकल्पीय अनुदानातून उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने सदर अंतरिम कर्जावरील व्याजाचे प्रदान प्रथम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी करावे. तसेच, व्याज प्रदानामध्ये default होऊ नये याची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दक्षता घ्यावी.

५.१३) सदर महामार्गावरुन ये-जा करणाऱ्या सर्व वाहनांची अचुक माहिती मिळण्याकरीता स्वतंत्र संगणकीय आज्ञावली (software) तयार करुन त्याचे संनियंत्रण मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करुन सदर समितीकडे देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने

प्राथम्याने कार्यवाही करावी. तसेच, टोल वसूलीबाबत Fast Tag (RFID Tagging) चा वापर सर्व वाहनांसाठी करावा.

६. **हमी शुल्क**

६.१) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीने शासन हमीवर घेतलेल्या कर्जावरील हमीशुल्काचा दर रु.२/- प्र.श.प्र.व. असा राहील.

६.२) मा.मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानुसार सदर शासन हमीवरील देय हमीशुल्क SPV चे भागभांडवल स्वरुपात रुपांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६.३) हे हमीशुल्क ज्या कालावधीकरिता देय राहील त्या कालावधीतील कोणत्याही दिवशी कमाल अदत्त असलेल्या कर्जाच्या रकमेवर देय राहील.

६.४) प्रत्येक वित्तीय वर्षाच्या ३१ मार्च आणि/ अथवा ३० सप्टेंबर रोजी अदत्त असलेल्या कर्जावर देय असलेल्या हमी शुल्काचे भागभांडवल स्वरुपात रुपांतर दर सहा महिन्यांनी अनुक्रमे १ एप्रिल आणि / अथवा १ ऑक्टोबर रोजी करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ/ नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनी हे जबाबदार असतील.

६.५) देय हमी शुल्क भागभांडवलात रुपांतरीत करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग/ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ/ नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनी यांचेकडून कसूर झाल्यास अशा कसूर केलेल्या थकीत रक्कमेवर पहिल्या तीन महिन्यासाठी १६ टक्के दराने व त्या पुढील कालावधीसाठी २४ टक्के दराने व्याज आकारले जाईल.

६.६) शासन हमीवरील घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत संनियंत्रणाची जबाबदारी सहसचिव/ उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांची राहील.

७. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नस्ती क्र.खाक्षेस-२०१७/प्र.क्र.१००/रस्ते-८ वरील प्रस्ताव व वित्त विभागाचा शासन हमी क्र. २/२०१९-२० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. या विशेष उद्देश वहन (SPV) कंपनीने अंतरिम कर्ज घेण्यासंबंधी करावयाच्या करारपत्रावर स्वाक्षरी करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधीत सहसचिव/ उपसचिव व वित्त विभागातील उप सचिव (अर्थबळ) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८०७१०२५२११२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Walter Cajetan Dmello

Digitally signed by Walter Cajetan Dmello
DN: CN = Walter Cajetan Dmello, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Finance Department
Date: 2019.08.07 10:46:59 +05'30'

(वॉल्टर डिमेलो)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव.

२) मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा/विधान परिषद, विधानभवन,मुंबई
४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
५) प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) प्रबंधक, उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
८) महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९) महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानभवन सचिवालय,मुंबई (५ प्रती)
११) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ,मुंबई.
१२) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा इटमेंट, आझाद मैदान, मुंबई
१३) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश,सी.डी.ओ.बॅरेक्स क्र १, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई- ४०००२०,
१४) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई- ४०० ००४.
१५) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॅाल, ग्लोव मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३,
१६) इंडियन नॅशनल कॉंग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई- ४०००२५.
१७) नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई- २१,
१८) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८,
१९) अपर मुख्य सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, नेपीयनसी रोड, प्रियदर्शनी पार्क जवळ, मुंबई-४०००३६.
२१) संचालक, नागपर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लि. नेपीयनसी रोड, प्रियदर्शनी पार्क जवळ, मुंबई-४०००३६.
२२) वित्त विभाग (साउ /व्यय-११ /ऋण व हमी नियंत्रण कक्ष), मंत्रालय, मुंबई.
२३) कार्यासन अधिकारी रस्ते-८, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई--४०० ०३२.
२४) भारतीय स्टेट बँक, सेंट्रल ऑफीस, स्टेट बँक भवन, मादम कामा मार्ग, मुंबई-४०००२१.
२५) निवड नस्ती -अर्थबळ.

ANNEXURE A

Proforma in which the information in respect of repayment of loan and financial liability of the borrower is to be submitted by the lending institute to the Government every six month (1st April/ 1st Oct)

1 **Name of Lending Institute:**

2 **Principal Debtor:**

3 **Name of Administrative Dept:**

4 **Guarantee No:**

5 **Date of Validity of Guarantee:**

6 **Report for the period from: To**

Guarantee & Repayment during the period **(Rupees)**

		Principal	Interest	Total
1	Outstanding guarantee at beginning of the period			
2	Additional guarantee sanctioned, if any during the period			
3	Toal Outstanding (1+ 2)			
4	Repayment of loan			
5	Balance at end of the period (3 - 4)			
6	Amount Credited in to Escrow A/C			
7	Net Balance (5 - 6)			

7 **Payment of Guarantee fees** **(Rupees)**

	Outstanding Amount	G. F.	Penal Fee	Total
1	Outstanding at the Beginning			
2	G. F. Paid (Rs.)			
3	Date			
4	Challan No.			
5	Balance at end of the period (1 - 2)			

8 **Types of assets taken as security against amount of loan / outstanding**

Description Secured	Estimated Value	How
(!)		
(ii)		
(iii)		
Total		

(P.T.O.)

9 Types of inspection of assets / due diligency by lending institute during last 6 months to ensure loans are properly secured.	
10. Financial Health of Principal Debtor (I) Total Turnover of the Principal Debtor (II) Total Profits (iii) % of profits as % of loan amount	
11. Is in the opinion of lending institute,the borrowing institute in a position to service the debt against which government guarantee is given	
12. Is in view of the lending institute, the borrowing institute being managed efficiently	
13. If not, type of corrective action proposed to be taken by lending institute	
14. Has the lending institute ensured that no further loans have been taken by the borrowing institute since the government guarantee was given	
15. Has the lending institute ensured that the guarantee fees has been paid to the Goveernment in order to keep the guareante alive and valid	